REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 10 | JULY - 2018

# शारदा नाटक आणि शारदा कायदा

**गौरी कानिटकर**
**संशोधक टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे.**

## प्रस्तावना




१८१८ मध्ये पेशवाई लयाला गेली होती.महाराष्ट्र हा पूर्वापार चालत आलेल्या रूढीपरंपरा बंधने याच्या कचाट्यात सापडला होता. अनेक वाईट प्रथा, परंपरांनी मूळ धरले होते. कलह, व्यसन आळशी पणायांनी समाज पोखर लागेला होता.समाजातील आदर्श लोप पावले होते. नवीन आदर्शांची निर्मिती अशक्य होऊन बसली होती. सरकार, संस्थानिक, सरंजामदार हा वर्ग व्यसनाच्या आहारी गेला होता. पेशवाई अस्तंगत झाल्याने लोकांच्या नोकऱ्या गेल्या, काम गेले ,त्यामुळे विपन्नावस्था आली. असा हा इंग्रजपूर्व समाज हजारो वर्षे एक प्रकारच्या स्थितीशील, गोठलेल्या अवस्थेत होता. समाजातील सर्व घडामोडी धर्मकल्पनेशी निगडीत होत्या. याच वेळी म्हणजेचएकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात हिंदुस्थानात ब्रिटीश राजवट आली.एका पूर्णपणे भिन्न असलेल्या जीवनशैलीशी भारतीयांचा संबंध आला. त्यामुळेहा भारताच्या , विशेष करून महाराष्ट्राच्या इतिहासातला अतिशय महत्वाचा कालखंड मानता येईल.प्रचंड सामाजिक आणि राजकीय उलथापाल थीचा हा काळ होता.शतकानुशतकेचालत आलेल्या रूढी, परंपरा , चालिरीतीआणिमूल्यांची तपासणी करण्याची गरज भासू लागली . याबरोबरच स्त्रीजीवनाचा विचारही अग्रस्थानी आला. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ज्ञानाची साधने वाढून शिक्षणाचा प्रसार झाला. इंग्रजांनी पाश्चात्य संस्कृतीचे लो ण समाजाच्या सर्व थरात नेऊन पोहोचविण्यासाठी देशी भाषांचा अवलंब केला. मुंबई, पुणे यांसारख्या शहरांतूनशाळा, महाविद्यालयांची स्थापना झाली. संस्कृत च्या बरोबरीने इंग्रजी भाषेचा अभ्यास होऊ लागला. त्यामुळे इंग्रजी साहित्याच्या व्यासंगात वाढ झाली. त्यामुळे सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिकअशा अनेक विषयांमध्ये नवीन विचार रुजविण्या चीसुरुवात झाली. व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुता अशा नव्या संकल्पनांकडेसुशिक्षितांचाओढा वाढू लागला. शिक्षणामुळे त्यांना आपले दोष दिसू लागले.

याच काळात विचारवंतांनी विवाहविषयक विविध प्रश्नांचा साकल्याने विचार के ला . इंग्रजी साहित्यात स्त्रीला मानाचे स्थान होते. त्याचा अभ्यास करत असताना आपल्याकडच्या स्त्रियां वर झालेल्या अन्याया ची जाणीव होऊन , स्त्री सुधारणेचे कार्यअनेक सुधारकांनी नेटाने पुढे नेले. स्त्रियांच्या संदर्भातल्या अनेक चळवळी सुरु झाल्या. स्त्रीसुधारणेचा प्रश्न अनेक अर्थाने सामाजिक सुधारणांशी निगडीत होता.

स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार, बालविवाहव जरठ कुमारी विवाहाला आणि कन्याविक्रयाला विरोध, विधवाविवाहाला उत्तेजन , केशवपनाला विरोध आणि संमतीवयाचा आग्रह यांसारख्या अनेक चळवळींना प्रारंभ झाला. इंग्रजांच्या आगमनामुळे मुद्रणकला अस्तित्वात आली. आपले विचार लोकांपुढे मांडण्यासाठी वृत्तपत्रांचा उपयोग सुरु झाला. कोणताही विचार सामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी वृत्तपत्रांची मोलाची मदत झाली.

## नाटक- लोकजागृतीचेसाधन

तत्कालीन समाजात समाज प्रबोधनाच्या चळवळीत नाटकांनी फार मोलाची भर घातल्याचे दिसते. स्त्रीसुधारणेच्या प्रत्येक प्रश्नावर सनातनी आणि सुधारक दोघांनीही नाटके लिहिल्याचे दिसतेनाटकातून समाजमनावर परिणाम होताना दिसत होता. लोकजागृतीचे एक साधन या दृष्टीने तत्कालीन समाज आणि नाटक यांचे जवळचे नाते होते. आपल्याला जे काही सांगायचे आहे त्यासाठी हा संवादात्मक प्रकार त्याकाळी सुशिक्षितांना जवळचा वाटत होता. नाटक हा साहित्यप्रकार एकाच

वेळी अनेकांशी संवाद साधणारा प्रकार आहे. नाटकाच्या या अंगभूत प्रभाव शक्तीचा तत्कालीन स्त्रीसुधारणा विषयक लेखनातपुरेपूर उपयोग करून घेतलेला आढळतो .

## स्त्रीशिक्षण--

एकोणिसाव्या शतकात सामाजिक सुधारणांची जी चळवळ झाली त्यात स्त्रीशिक्षणाला महत्वाचे स्थान होते. स्त्रीशिक्षणाला एका बाजूने विरोध होत होता, तर त्याच वेळी स्त्रीशिक्षणाची बाजू उचलून धरली जात होती. खास मुलींसाठी शाळा निघत होत्या. स्त्रीशिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाल्याखेरीज समाजाची सर्वांगीण प्रगती होणार नाही असे आगरकरांचे मत होते. बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग , भांडारकर आदि सुधारकांनी स्त्री शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी अतोनात श्रम घेतले.१८५१- १८५२ या वर्षात पुण्यातील बुधवार, रास्ता आणि वेताळ या तीन पेठांमधूनमहात्मा फुले यांनी शाळा उघडल्या.या सर्व समाजसुधारकांनी स्त्रीला पुरुषांप्रमाणेच माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे याची जाणीव समाजाला करून दिली. त्यांनी संस्था स्थापल्या, लेख लिहिले, सभा घेतल्या, स्वतःच्या पत्नीला शिक्षण घेण्याची सक्ती केली अशा विविध मार्गांनी स्त्रीशिक्षणाचा मार्गचोखाळला.शिक्षणाने स्त्रीचा दुबळेपणा दूर होईल, तिला स्व- रुपाची ओळख पटेल आणि स्त्रियांच्या प्रगतीसाठी स्वतः स्त्रियाच या चळवळीचा प्रारंभ करतील याची खात्री स्त्री सुधारकांना वाटत होती आणि त्यामुळे त्यांनी त्याचा पाठपुरावा केला. स्त्रीशिक्षणाला समाजाच्या सर्व थरातून विरोध होत होता. त्यासाठी पूर्वग्रहदुषित धर्मविचारांचा फार मोठा पगडा समाजमनावर होता. स्त्रिया शिकल्या तर अल्प वयात विधवा होतील ही भीतीही तत्कालीन समाजात रूढ होती. त्याच प्रमाणे स्त्रिया शिकल्या तर आईवडिलांनी वरसंशोधन करून मग विवाह करून दिलेल्या नवर्यापेक्षा स्वतःच्या आवडीच्या पुरुषाशी त्या संबंध ठेवतील ही भीती होती.स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने शिकल्या तर त्या बरोबरीचे हक्क मागू लागतील ही भीतीही होतीच.

परंतु समाजातील वरच्या वर्गातील मंडळींपैकी , ज्यांना शिक्षणामुळे नवीन दृष्टि आली होती अशांना आपल्या मुलींनी शिक्षण घ्यावे असे वाटत होते. पण याच वेळी एक अतिशय महत्वाची गोष्ट अशी होती की मुलीचे लग्नाचे वय आठ ते बारा वर्षे होते. एकदा तिचे लग्न झाले की तिचे शिक्षण थांबत असे. आणि विवाह होईपर्यंत दिले जाणारे शिक्षण बेतासबात होते. जेमतेम प्राथमिक शिक्षणापलीकडे शिक्षणाचा विचार नव्हता. त्यामुळे मुलींना हायस्कूल मधील शिक्षणद्यावे यासाठी ' महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटी ' ची स्थापना झाली. स्त्रीशिक्षणाचा प्रश्न घरीदारी चर्चेचा विषय झा ला होता. तत्कालीन समाजाचा कोणताही प्रश्न नाटकाच्या रुपात मांडला जात होता , हे आपण पाहिलेच.

## स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार करणाऱ्यानाटकांपैकी काही पुढीलप्रमाणे—

सुशिक्षित स्त्री – एक स्त्री – शिक्षण सुधारणेच्छू- १८८६

गोदावरी अथवा दुर्दैवी सून – म.गो.लोंढे -- १८९०

संगीत सावित्री – अ. मा. जोशी – १८९९

गुप्तमंजुष – श्री. कृ. कोल्हटकर – १९०३

भ्रमनिरसन – वि.सी. गुर्जर –१९११

ज्याप्रमाणे स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणारी नाटके लिहिली गेली त्याप्रमाणे स्त्रीशिक्षणाला विरोध करणारी नाटकेही लिहिली गेली.

उदा.

गर्हित स्त्रीशिक्षण प्रहसन – गं. ब. काळे – १८८५

तरुणीशिक्षण नाटिका – ना. बा . कानिटकर-- १८८६

पतिविटंबना अथवा भार्याप्रमाद – ना. ह. भागवत – १८८८

न्यायविजय नाटक – ना. बा. कानिटकर – १८८९

एज्युकेटेड छबकडी अथवा म्हातार चळाचा दुष्परिणाम -- ज.ग. बेडेकर – १८९८

## बालविवाह

स्त्री शिक्षणाबरोबरच मुलीच्या व्यक्तिमत्व विकासाच्या आड येणारी बाब म्हणजे बालविवा हाची रूढी, हे सुधारकांच्या लक्षात आले. बालविवाह नुसता रूढच नव्ह ता तर शास्त्र संमत आहे अ साही समज होता. रजोदर्शनापूर्वी मुलीचा विवाह झालाच पाहिजे असा समज होता . जर झाला नाही तर त्या कुटुंबाला वाळीत टाकले जाई.त्यामुळे मुलीचे लग्न बालवयातच उरकून टाकण्याची आई वडिलांना होत होती.एका बाजूने वधूचा विवाह रजोदर्शनापूर्वी झालं पाहिजे या रुढीचा इतका अतिरेक झाला की गर्भावस्थेतील मुला मुलींच्या विवाहाचे बेत त्यांचे आईवडील करीत. " त्याचबरोबर कामवासनेची झुळूक ही अंगावरून गेली नसणाऱ्या अल्पवयीन वधू वरांचे शारिरीक संबंध घडलेच पाहिजे अ सा सोसही तेव्हाच्या आई बापांना का वाटत असावा? " असे प्रतिभा रानडे आपल्या स्त्री प्रश्नांची चर्चा – एकोणिसावे शतक या ग्रंथात नमूद करतात. ( पृष्ठ९६)

त्याकाळात अनेक नामवंतांचे विवाह त्यांच्या लहान वयातच झालेले दिसतात.तशी पद्धतच होती.

घाईघाईने लग्न उरकून टाकत असताना वधूला अनुरूप असा वर शोधण्या ऐवजीअनेकदा प्रौढ किंवाजरठ वरांची निवड केली जाई. असे विषम विवाह आणि बाला जरठ विवाहांचे प्रमाण तत्कालीन समाजात मोठ्या प्रमाणात होते. हिंदू संस्कृतीत मुलीपेक्षा मुलाला महत्व आहे. मुलगा हवा, वंशाला दिवा हवा म्हणून पुरुषांनी एकाच वेळी अनेक विवाह करण्याची अमानुष प्रथा त्याकाळी सरसकट होती . त्यातूनच कन्याविक्रयाची प्रथा त्याकाळीरूढ झाली होती. बाला जरठ विवाहामुळे तत्कालीन समाजात विधवांची संख्या मोठ्या प्रमाणावर होती.हिंदू संस्कृतीत विधवा स्त्रीला केशवपनाच्यारूढीला तोंड द्यावे लागे.एकूणातच त्याकाळी स्त्रियांचे जीवन अतिशय हलाखीचे होते.महाराष्ट्रात बहेरामजी मलबारी शेठ , न्यायमूर्ती तेलंग, न्यायमूर्ती रानडे , गोपाल गणेश आगरकर आदींनी बालविवाहाचे अनिष्ट परिणाम लक्षात घेऊन ही रुढी मोडून काढण्यास पुढे सरसावले. पण सनातनी हिंदूंनी या स माजसुधाराकांवर बहिष्कार टाकला. तरीही त्यांनी नाना उपाय करून आपला प्रयत्न नेटाने चालूच ठेवला.ही अनिष्ट रूढी कदाचित कायद्यानेच बंद होईल या हेतूने सुधारकांनी त्या दिशेने चळवळ करायला सुरुवात केली.

## संमतीवयाचा कायदा

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीला संमती वयाच्या या कायद्यावर उलटसुलट चर्चा झाल्या. पीनल कोडात जबरी संभोग किंवा बलात्कार हा गुन्हा आहे. या पीनल कोडाप्रमाणे स्त्री जर दहा वर्षाहून लहान असेल तर ती ह्या कृत्यास संमती देण्याइतकी सुजाण मानली जात नाही आणि तिची संमती असली तरी हे कृत्य तिच्या बाबतीत पुरुषाकडून घडलेला गुन्हाच मानला जातो. संमती वयाच्या कायद्याची चळवळ सुरु झाली ती स्त्रीचे वय दहा च्या ऐवजी बारा करावे या मागणीमुळे. त्या सुमारास ( १८९० ) बंगाल मध्ये फुलमणीची केस गाजत होती. त्या घटनेतील क्रूरता लक्षात घेऊन ब्रिटीश सरकारलाही या संदर्भात कायदा करावासा वाटला. या कायद्याच्या बाजूने आणि विरोधात सभा घेतल्या गेल्या. अखेरीस २१ मार्च १८९२ रोजी ' संमती वयाचा कायदा ' पासझाला आणि त्यामुळे वयाची मर्यादा दहा वरून बारा करण्यात आली. पण या कायद्याचा व्हावा तसा उपयोग झाला नाही. कारण लग्न ही अत्यंत खाजगी बाब असल्याने मुलीचे आई वडील किंवा मुलगी पतीवर फिर्याद करतील अशी शक्यताच त्या काळी नव्हती. तत्कालीन समाजात बाल विवाह आणि बालाजरठ विवाह हे कायद्यानंतरही चालूच राहिले.

## संगीत शारदा

या शतकाच्या अखेरीस घडलेली एक महत्वाची घटना म्हणजे गोविंद बल्लाळ देवल यांनी लिहिलेले ' संगीत शारदा ' हे नाटक प्रदर्शित झाले. संगीत शारदा हे मराठीतील पहिले यशस्वी सामाजिक नाटक मानले जाते. तत्कालीन समाजात मुलाचे आणि मुलीचे लग्नाचे वय ठरविणारा संमती वयाचा कायदा चर्चेत होता. देवलांच्या या नाटकाने मोठी समाज जागृती केली.बाला जरठ विवाहाचा प्रश्न संगीत शारदा च्या आधी आणि नंतरही अनेक नाटकांमधून मांडला गेला. तथापि संगीत शारदा हे नाटक एकोणिसाव्या शतकातील सामाजिक नाटकांमध्ये मैलाचा दगड ठरले. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे या नाटकातील केलेली अनुभवांची मांडणी होय. आजच्या काळातही हे नाटक एक उत्कृष्ट नाट्यानुभव म्हणून उल्लेखनीय ठरते. तत्कालीन समाजाला गंभीरपणे भेडसावणाऱ्या समस्येचे चित्रण त्यातकलात्मकतेने केले आहे. देवलांनी अतिशय संवेदनशीलतेनेबाला जरठ विवाहाच्या समस्येचे चित्रण केले आहे.

**कथानक**

या नाटकातील भुजंगनाथ यापंचाहत्तर वर्षे वयाच्या माणसाच्या पत्नीचे निधन झाले आहे. तो एकटा पडला आहे. तसेच तो निपुत्रिकही आहे. तत्कालीन समाजाची धारणा ही होती की निपुत्रिकाला नरकवास सोसावा लागतो.त्यामुळे तो लग्न करू इच्छितो आणि तेही अगदी लहान वयाच्या मुलीशी. भद्रेश्वर या मध्यस्थाच्या मदतीने खुद्दशारदेचेवडील कांचनभट हे द्रव्यालोभापायी तिचेलग्न भुजंगनाथाशी ठरवतात. शारदाअसते फक्त चौदा वर्षाची. ' शारदा' नाटकातील तिसरा अंक देवलांच्या रचनातंत्राच्या दृष्टीने अत्यंत कलात्मक झाला आहे. शारदेचे लग्न एका म्हाताऱ्याशी ठरत आहे हे शारदेची मैत्रीण वल्लरी ला कळते. हीगोष्ट वल्लरी इतर सगळया मैत्रिणींना शारदेसमोरचसांगते, आणि त्यावरून त्या साऱ्याजणी तिची थट्टा करतात. ' म्हातारा इतुका न अवघे पाऊणशे वयमान ' असे त्याचे वर्णन ऐकून मैत्रिणींप्रमाणे प्रेक्षकही व्यथित होतो. शारदेच्या समोर तिचे स्वतःचे पुढचे भवितव्य दिसू लागते. ' मूर्तिमंत भीती उभी मजसमोर ठाकली' असे उद्गार तिच्या तोंडून बाहेर पडतात. तिच्या वडिलांनी तिचे ठरवलेले हे लग्न तिच्या आईला – इंदिरकाकूंनाअजिबात पसंत नाही, पण बायकांचे मत विचारात घेण्याचा तो काळ नव्हताच. त्यांनी कितीही विरोध केला तरी कांचनभट बधत नाहीत पुढे कोदंड हा समाजसुधारक मध्ये पडून शारदेचा भुजंगनाथाशी असलेला विवाह टळतो. पण एकदा विवाह ठरलेला असून मोडल्यानंतर शारदेसमोर दुसरेच संकट उभे राहते. एकदा विवाह मोडलेल्या मुलीशी लग्न कोण करणार असा प्रश्न उभा राहतो.पण कोदंड शारदेशी लग्न करायचे ठरवून तो प्रश्न सोडवतो.

**शारदा कायदा**

बेहरामजी मलबारी सारख्या सुधारकांनी अनेक वर्षे केलेल्या चळवळीचे फलित म्हणजे हरविलास सरडा यांचे विधेयक होय. हे हिंदू बालविवाह प्रतिबंधक बिल होते. परंतु विवाह ही आमची धार्मिक आणि खाजगी बाब आहे असे म्हणून सनातन्यांनी याही बिलास विरोध केलं. पण संमती वयाच्या बिलाच्या वेळे पेक्षा हा विरोध तुलनेने क्षीण होता. हे विधेयाल १९२९ साली पास झाले. संमती वयाच्या बिलात आणि शारदा कायद्यात ३०/४० वर्षाचे अंतर होते. पण लक्षात कोण घेतो, शारदा सारख्या कलाकृतींनी जनमानसाची पकड घेतली होती. मनोरंजन आणि करमणूक आदी वृत्तपत्रांनी याबालविवाह, बालाजरठविवाह या प्रश्नांचा पाठपुरावा केला होता. त्यामुळे समाजात जागरुकता निर्माण झाली होती.

शारदा नाटकातील बाला जरठ विवाह आणि कन्याविक्रय या समस्या जनतेच्या मनात इतक्या ठसल्या होतुं की बिल पुढे आणणारे ' हरविलास सारडा ' आणि ' शारदा ' या नावांची अदलाबदल होऊन हे विधेयक ' शारदा कायदा ' म्हणून ओळखले जाऊ लागले , हेदेवलकृत' संगीत शारदा ' या नाटकाचे यशच मानावे लागेल.